# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०११/प्र.क्र.२/कार्या-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०००३२.
दिनांक- १६ मे, २०११.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- माहे जुलै ते डिसेंबर-२०११ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत नव्याने आरक्षण व सोडतीबाबतचा कार्यक्रम

संदर्भ:- १)या कार्यालयाचे क्रमांक-रानिआ/ग्रापनि/२०११/प्र.क्र.२/का-८, दिनांक- १३/५/२०११ चे पत्र

२) जिल्हाधिकारी,ठाणे यांचे क्रमांक/सामान्य/कक्ष-४/टे.नं.५/ ग्रा.प./कावि ०५/२०११, दिनांक १६.५.२०११ चे पत्र.

महोदय,

जिल्हाधिकारी कार्यालयाने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे:-

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०(१अ)(दोन) मध्ये नमूद केल्याप्रमाणे "संपूर्णत: अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायतीमध्ये, अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा पंचायतीमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांश पेक्षा कमी असणार नाही"अशी तरतूद आहे. तसेच कलम १०(२)(क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे "अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायतींमध्ये नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती यांच्यासाठी राखून ठेवण्यात आल्यानंतर राहिलेल्या, कोणत्याही असल्यास जागांच्या २७ टक्के इतक्या राहतील," असे नमूद आहे. अशावेळी काही ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तीसाठी, केवळ एक जागा राखीव राहण्याची शक्यता आहे. अशाच प्रकारे काही ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जातीसाठी केवळ एक जागा आरक्षित राहण्याची शक्यता आहे.

अशा परिस्थितीमध्ये अनुसूचित जमातीकरिता ५० टक्के जागा स्त्रियांसाठी आरक्षित केल्यास आणि अनुसूचित जाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग याकरिता एकच जागा आरक्षित राहिल्यास

आणि ती या निवडणुकीत स्त्रियांकरिता आरक्षित करावी किंवा पुढील निवडणुकीत आरक्षित करावी, यासाठी सोडत काढल्यास अशी जागा या निवडणुकीत आरक्षित न होता पुढील निवडणुकीत आरक्षित करावी म्हणून सोडत निघू शकते. याचा परिणाम म्हणून एकूण जागांच्या ५० टक्के जागा स्त्रियांसाठी कदाचित आरक्षित होणार नाहीत. त्यामुळे ज्या ठिकाणी अनुसूचित जमातीकरिता जागा आरक्षित केल्यानंतर यथास्थिती अनुसूचित जाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग याकरिता एकच जागा राखीव राहात असेल तर ती जागा या निवडणुकीत स्त्रियांकरिता आरक्षित करण्यात यावी.

तसेच विशेषतः अनुसूचित क्षेत्रात ब-याच ग्रामपंचायती ७ सदस्यांच्या आहेत व त्या ठिकाणी ना.म.प्र. व सर्वसाधारण प्रवर्गासाठी एखादी जागा शिल्लक राहते. मात्र अ.जा./अ.ज. आरक्षण दिल्यानंतर ही जागा स्त्री आरक्षित करताना ज्या प्रभागात आहे, त्या प्रभागात पूर्वीच एक जागा स्त्रीयांसाठी आरक्षित असू शकते व जर हा प्रभाग दोन सदस्यांचा असेल तर त्याच प्रभागात पुन्हा ना.मा.प्र. अथवा सर्वसाधारण गटाचे महिला आरक्षण देताना पूर्ण प्रभाग स्त्रियांसाठी आरक्षित होऊ शकतो अपवादात्मक परिस्थितीत असे करण्यास हरकत नाही.

तसेच काही ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण निश्चित करताना अनु. जाती, अनु. जमाती मधील स्त्री आरक्षण निश्चित केल्यावर उर्वरित स्त्री आरक्षण संख्येएवढयाच जागा ना.मा.प्र. व सर्वसाधारण प्रवर्गासाठी शिल्लक राहू शकतात अशा वेळी उर्वरित सर्व जागा स्त्री आरक्षण संख्येएवढया असतील तर त्या पूर्णपणे स्त्रियांसाठीच राखून ठेवणे आवश्यक आहे. याकरीता सोडत काढण्याची आवश्यकता राहणार नाही.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग याकरिता जागा आरक्षित ठेवताना अशा वर्गवारीसाठी केवळ एकच जागा राखीव असून ती जागा दोन जागांच्या प्रभागात येत असेल आणि त्या प्रभागातील एक जागा स्त्रियांसाठी यापूर्वीच दिनांक- १३/५/२०११ च्या आदेशानुसार कार्यवाही करताना आरक्षित झाली असेल तर अशा दोन जागांच्या प्रभागात एकापेक्षा अधिक जागा (दोनही जागा) स्त्रियांकरिता आरक्षित करण्यास हरकत नाही.

( मंगेश व. मोहिते )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग